# गुप्तकालीन स्त्रीजीवन – एक अभ्यास

– प्रा. अश्विनी खवळे, कोल्हापूर

**प्रस्तावना :**

प्राचीन भारतीय संस्कृतीमध्ये स्त्रियांना आदराचे स्थान दिलेले आहे. प्राचीन भारतीय ग्रंथ व लेखकांमध्ये स्त्रियांसंबंधी परस्परविरोधी विचार पहावयास मिळतात. जरी काही ग्रंथांमधून त्यांच्या चरित्राबद्दल कटू आलोचना केली असली तरी शास्त्र व महाकाव्यामध्ये स्त्रीला महत्त्वपूर्ण आदर्शची प्रतिष्ठा मिळाली आहे. शतपथ ब्राह्मणांमध्ये स्त्रीला पुरुषाची अर्धांगिनी समजले आहे. (अर्धो हवा एष आत्मनो) महाभारतामध्ये गृहिणी हीच गृह आहे असे म्हटले आहे. स्मृतीग्रंथामध्ये सुद्धा स्त्रियां प्रती प्रशंसामुक्त विचार व्यक्त केलेले आहेत.

यत्र नार्यास्तू पूज्यन्ते रमन्ते तत्र देवता।
यत्रैतास्तू न पूजन्ते सर्वास्तत्राफला: क्रिया।।

– मनु ३.५६

मनुस्मृतीमध्ये स्पष्टपणे म्हटले आहे की, जेथे स्त्रियांचा आदर केला जातो तेथे देवतांचा वास असतो. जेथे त्यांचा सन्मान होत नाही तेथे सारी कामे निष्फळ ठरतात. कोणत्याही त्रिकालदर्शी महर्षि असो अथवा महापुरुष त्यांचा जन्म मातेच्या गर्भातूनच होत असतो. परंतु स्त्रीजातीबद्दल त्यांचा फतवा आहे. 'न स्त्री स्वातंत्र्यामर्हति' अनादी काळापासूनच वेद आदी शास्त्रानुसार स्त्रिया पारतंत्र्यात राहतात व पतिव्रत पालन करतात.

गुप्तकालीन साहित्य आणि कलेमध्ये स्त्रियांचे आदर्श रूप वर्णन केलेले आहे. परंतु व्यावहारिक दृष्टीने समाजामध्ये स्त्रियांचे स्थान खालावलेले होते. स्त्रियांसंदर्भात त्या काळामध्ये काही गोष्टी विकसित झाल्या. त्यांचे शिक्षणाचे अधिकार, धार्मिक बाबी, प्रथा-परंपरा, सतीप्रथा, पडदापद्धत इ. गोष्टीच्या रुपात पहावयास मिळते.

**उद्देश :**

गुप्तकाळामध्ये स्त्रियांच्या शिक्षणाचे आपल्याला साहित्यिक प्रमाण पहावयास मिळते. स्त्रियांना पत्नी, माता, कन्या म्हणून त्यांना आदराचे स्थान होते. तरीसुद्धा

आपल्याला पहावयास मिळते की, स्त्रियांची स्थिती गुप्तकाळामध्ये खालावलेली होती. त्या काळातील काही सुशिक्षित महिलांचा उल्लेख जरी सकारात्मक बाब असली तरी शूद्र जातीच्या स्त्रियांना तो अधिकार नव्हता. गुप्तकालीन स्त्रियांच्या जीवनातील शैक्षणिक, वैवाहिक, आर्थिक, राजकीय, सामाजिक असे विविध पैलू स्पष्ट करणे व त्यांच्या वर्तमान स्थितीच्या प्रासंगितकेची चर्चा करणे हा या शोधनिबंधाचा मुख्य उद्देश आहे.

**स्त्रीशिक्षण :**

गुप्तकाळातील उच्चवर्गीय स्त्रियांना शिक्षणाचा मर्यादित अधिकार होता. परंतु शूद्र स्त्रिया मात्र शिक्षणापासून वंचित होत्या. कालिदासाने 'अभिज्ञानशाकुंतलम्' मध्ये 'अनुसूया' हिला इतिहासाचे ज्ञान असल्याचे म्हटले आहे. 'अमरकोश'मध्ये शिक्षिकांसाठी उपाध्याया व आचार्या या शब्दांचा उल्लेख केला गेला आहे. उच्चवर्णीय समृद्ध कुटुंबातील मुलींना साहित्य व संस्कृतीचे शिक्षण दिले जाई. गुप्तकाळात 'भट्टारिका' ही विदूषी होऊन गेली. दक्षिणेत स्त्रिया संगीत, नृत्य या कलांचे जाहीर प्रदर्शन करीत. गुप्तकाळात शूद्रांप्रमाणे स्त्रियांनाही रामायण, महाभारत, पुराणे यांचे श्रवण करण्याची अनुमती दिली गेली होती. सनति, शतक्ष्पा आध्यात्मिक ज्ञानामध्ये निपुण होत्या. राजशेखरच्या 'काव्यमीमांसा' वरून समजते की, स्त्रियासुद्धा कवयित्री होत्या. विविध कलांमध्ये पारंगत असलेल्या स्त्रियांचा उल्लेख ही पहावयास मिळतो. जशी मालती, माधवची 'मालती' चित्रकलेमध्ये निपुण होती. परंतु 'याज्ञवल्क्य स्मृती'मध्ये कन्येचा उपनयन व वेदाध्ययनासाठी निषेध दर्शविला आहे. तसेच या काळातील स्त्रियांचा उपनयन संस्कार बंद झाल्याने विवाह हाच त्यांच्यासाठी उपनयन समजला जावू लागला व त्यामुळे लहान वयात लग्न होत असल्याने शिक्षण घेण्यात अडचणी निर्माण झाल्या. त्यामुळे या काळातील स्त्रियांचा सामाजिक दर्जा खालावल्याचे पहावयास मिळते.

**राजकीय कार्य :**

सातवाहनांच्या विरुद्ध गुप्तांच्या राज्यामध्ये राजकीय उत्तराधिकारी विशुद्ध रुपाने गुप्तकाळामध्ये पितृसत्ताक पद्धत होती. गुप्त काळातील सम्राटांनी आपल्या मातेच्या नावाचा उल्लेख केलेला आहे. गुप्तकालीन अभिलेखांची ही विशेषता पहावयास मिळते की, यावर राण्यांचे नाव अंकित करण्यात येऊ लागले. सगळ्यात

प्रथम चंद्रगुप्त प्रथम याने लिच्छवी राजा वृषदेव तेरावा याची कन्या कुमारदेवीशी विवाह केला होता व 'प्रयागप्रशस्ति'मध्ये राणी कुमारदेवीचा उल्लेख केला गेलेला आहे. गुप्तकालीन शिक्क्यांची नाविन्यता पहावयास मिळते की, आता शिक्क्यांवर राजासोबत त्याच्या पत्नीची आकृती अंकित करण्यात आली. याचे पहिले साक्ष गुप्तांचे प्राचीनतम स्वर्णशिक्के चंद्रगुप्त कुमारदेवी प्रकाराने मिळायला सुरुवात होते. याचबरोबर त्याचे राज्यदंपती व विवाहप्रकार पहावयास मिळतात. समुद्रगुप्त कुमारदेवीचा पुत्र असल्याने त्यांना 'प्रयागप्रशस्ती'मध्ये 'लिच्छविदौहित्र' म्हटले गेले आहे. समुद्रगुप्ताची पत्नी दत्तदेवीने अश्वमेघ यज्ञामध्ये भाग घेतला होता. कुमारदेवी व प्रभावतीगुप्ताचा अपवाद सोडल्यास कोणतीही गुप्तकालीन महिला प्रशासनाशी संबंधीत नव्हती. कुमारदेवीने आपला पती चंद्रगुप्त प्रथम सोबत शासन केले आहे. द्वितीय चंद्रगुप्ताची मुलगी प्रभावतीगुप्ताने वाकाटक राज्याची संरक्षिका म्हणून कार्यभार सांभाळला होता. प्रभावती गुप्ताच्या वेळी वाकाटकांवर चंद्रगुप्त द्वितीयचा प्रभाव अत्यधिक होता. हेच कारण आहे की, तिने आपल्या पुना ताम्रपत्रामध्ये आपल्या पतीच्या गोत्राचा उल्लेख न करता आपल्या पित्याच्या गोत्राचा (धारण गोत्र) उल्लेख केला आहे. यावरून समजते की गुप्तकाळातील स्त्रियांचा राजकारणातील सहभाग अगदी नगण्य स्वरूपात होता.

**स्त्रियांचे धनसंबंधी अधिकार :**

प्राचीन भारतीय सभ्यतेमध्ये वैदिक काळापासूनच पती-पत्नी दोघांनाही पारिवारीक संपत्तीचे संयुक्त अधिकारी मान्य केलेले आहे. विवाहाच्या वेळी पती ही प्रतिज्ञा करतो की, तो आर्थिक बाबींमध्ये आपल्या पत्नीच्या अधिकाराची व हिताची उपेक्षा करणार नाही. मनुस्मृतीमध्ये म्हंटले आहे की, आपल्या पत्नीची योग्य निर्वाह व्यवस्था केल्याशिवाय पती परदेशगमन करू शकत नाही. गुप्तकालीन स्मृतीमध्ये स्त्रियांच्या संपत्तीसंबंधी अधिकारांना मान्यता देण्यात आली. तसेच हे अधिकार अधिक विस्तारलेले दिसून येत आहेत. तसेच पुरुषांच्या स्थायी मालमत्तेवर स्त्रियांचा अधिकार असतो आणि स्त्री धनासोबत ती ही मालमत्ता विकू शकते अथवा गहाण ठेवू शकते. याज्ञवल्क्य हा पहिला स्मृतीकार आहे, ज्याने पतीच्या पुत्रविरहीत निधनानंतर स्त्रिला पतीच्या संपत्तीचे अधिकारी मानले आहे. विधवांच्या

संपत्तीसंबंधीच्या अधिकाराची त्यांनी उदारपणे व्याख्या केलेली आहे. त्यांनी उत्तराधिकारी म्हणून पुत्रानंतर त्या स्त्रीस अधिकार दिलेले आहेत. याज्ञवल्क्य व बृहस्पती यांनी स्त्रीला पतीच्या संपत्तीची उत्तराधिकारी मानली आहे आणि तिच्यानंतर कन्येला. बृहस्पती आणि नारदांनी म्हटले आहे की, कन्यासुद्धा पुत्रासमान संतती आहे. म्हणून जर पुत्र नसेल तर कन्येचा पित्याच्या संपत्तीवर अधिकार असेल. कात्यायनाने पत्नीला 'धनहरि' (संपत्ती प्राप्त करणारी) म्हटले आहे आणि ती जीवंत नसल्यास कन्येला. परंतु नारदासारख्या शास्त्रकारानुसार ज्या व्यक्तिस मूलबाळ नसेल त्याची संपत्ती राज्याने अधिग्रहीत केली पाहिजे आणि राजाचे हे कर्तव्य आहे की, त्याने विधवांचे पालनपोषण करावे. या काळात विधवांचे जीवन खडतर होते म्हणून काही विचारवंतांनी तिच्या संपत्तीविषयीचे अधिकार स्वीकारले आहेत.

**स्त्रीधन :**

हिंदू व्यवस्थाकाराने स्त्रियांना चलसंपत्तीमध्ये पूर्ण अधिकार प्रदान केलेला आहे. स्त्रिला विवाहाच्या वेळी भेट म्हणून मिळालेली रत्नभूषणे, अलंकार, बहुमूल्य वस्त्रे यांसारख्या वस्तूंवर तिची मालकी असल्याचे सर्वच प्राचीन स्मृतीग्रंथांत म्हटले आहे. त्यांच्यानुसार विवाहाच्या वेळेस वधूचे मातापित्याकडून ते सासू-सासरे यांनी ज्या भेटवस्तू दिलेल्या असतात त्यास 'स्त्रीधन' असे म्हटले जाते. स्मृतीग्रंथांच्या अध्ययनातून आपणास स्त्रीधनाविषयी विस्तृत माहिती मिळते. मनुने स्त्रीधनाचे सहा प्रकार सांगितले आहेत.

१) पित्याद्वारे कोणत्याही वेळी मिळालेला उपहार.

२) मातेद्वारे दिलेला उपहार.

३) भावाद्वारे दिलेला उपहार.

४) पतीद्वारे विवाहानंतर दिलेला उपहार.

५) विवाहाच्या वेळी इतरांकडून मिळालेले उपहार.

६) विवाहानंतर कोणाकडूनही मिळालेले उपहार.

स्त्रीधनाची दोन भागामध्ये विभागणी केलेली आहे.

१) सौदाकीय;

२) असौदाकीय

सौदाकीयानुसार कन्या माता, पिता किंवा पतीकडून प्राप्त धन स्वत:जवळ ठेवू शकते व त्याच्यावर तिचा पूर्ण अधिकार असेल. तसेच दुसऱ्या नातेवाईकांकडून किंवा साधनाकडून प्राप्त झालेले स्त्रीधन असौदाकिय समजले जाते. सौदाकीय धनावर तिचा अधिकार असला तरी ती असौदाकीय धन उपयोगात आणू शकते, परंतु विकू शकत नाही. कात्यायनानुसार स्त्री आपली संपत्ती (स्त्रीधन) विकू शकते किंवा गहाण ठेवू शकते. परंतु नारदाच्या म्हणण्यानुसार स्त्रीचा स्त्रीधनामधील केवळ चलसंपत्तीच विकता येईल. ज्या स्त्रिया व्यभिचारी, अपवित्र, चांगले आचरण असणाऱ्या नव्हत्या त्यांना स्त्रीधनापासून वंचित करण्याचे विधान शास्त्रकाराने केलेले आहे.

'अप्रजस्त्रीधन भर्तृब्राह्मादिषू चतुर्ष्वपि।
दृहितृणा प्रसुता चेच्छेषेशु पितृणामि तत।।'

– याज्ञवल्क्य २, १४५

प्रारंभी स्त्रीधनाचे क्षेत्र संकुचित होते. त्यामध्ये वस्त्रे, आभुषणे येत. नंतरच्या काळात ते व्यापक बनले. शेवटी स्त्रीधन हे उत्तराधिकारामध्ये कन्येला देण्याबद्दल कोणीही विरोध केला नाही.

**विवाह :**

प्राचीन हिंदू समाजाचा सर्वाधिक महत्त्वपूर्ण संस्कार म्हणजे 'विवाह' होय. ज्याचे महत्त्व आजही विद्यमान आहे. गृहस्थाश्रमाचा प्रारंभ याच संस्काराने सुरु होतो. याचा शाब्दिक अर्थ आहे वधूला वराच्या घरी घेऊन जाणे अथवा पोहोचवणे. प्राचीन भारतीय समाजामध्ये यास पवित्र धार्मिक संस्था म्हणून मान्यता मिळाली. ज्याचा उद्देश पती व पत्नीच्या सहयोगाने विभिन्न पुरुषार्थ पूर्ण करणे आहे. याचा आदर्श फक्त यौनसुख प्राप्त करणे नसून संतती उत्पत्तीला धर्मगत आधार बनला.

'अपत्नीको नरो भुप कर्मयोग्यो न जायते।
ब्राह्मण: क्षत्रियो वापि वैश्य: शूद्रोऽपि वा नृप:।।

– याज्ञवल्क्य १.५१

याज्ञवल्क्याने स्पष्ट लिहिले आहे की ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र कोणीही असो; जर तो विवाहीत नसेल तर तो कर्म करण्यायोग्य नाही. शक्यतो सजातीय विवाह होत होते. कधी-कधी खालच्या वर्णातील स्त्रियांचे उच्चवर्णामध्ये विवाह

होत होते. अशा विवाहांना 'अनुलोम' विवाह म्हटले जात होते. स्मृतीग्रंथ यांना मान्यता देतात. गुप्तकाळामध्ये मुलींचा विवाह सामान्यत: १२-१३ वर्षाची असताना होत असत. 'याज्ञवल्क्य' नुसार स्त्रियांचा विवाह हाच त्यांचा उपनयन संस्कार आहे. ऋतुप्राप्ती पूर्वीच कन्येचा विवाह करावा असा आदेश स्मृतीतून देणेत आला आहे. पुराणामधूनही स्त्रीच्या विवाहाची वयोमर्यादा कमी करण्याचीच प्रवृत्ती आढळून येते. या काळात स्त्रियांच्या स्थितीमध्ये निरंतर ऱ्हास होताना पहावयास मिळतो. स्त्रियांच्या अज्ञानामुळे स्मृतीकारांनी हा सिद्धांत मांडला की पती हा पत्नीचा देव आहे आणि तिचा धर्म आहे त्याची आज्ञा पाळणे व पूजा करणे. उपनयन समाप्ती व बालविवाहाच्या प्रचलनामुळे तिला समाजामध्ये अत्यंत खालच्या स्थितीमध्ये आणून ठेवले.

**बहुपत्नीत्व :**

गुप्तकाळामध्ये बहुपत्नीत्वाची प्रथा राजघराणे, सरदार व श्रीमंत लोकांपुरतीच मर्यादित असावी. या काळात ही प्रथा पहावयास मिळते. गुप्तकाळातील उच्चवर्णीय लोक जास्तीतजास्त जमीन अर्जित करीत असत. ज्यामुळे त्यांच्यात एकापेक्षा जास्त पत्नी असल्याची उदाहरणे पहावयास मिळतात. पत्नीला खाजगी संपत्ती मानले जावू लागले. बहुपतीत्वाची प्रथा फार थोड्या प्रमाणात पहावयास मिळते. प्राचीन भारतीय संस्कृतीमध्ये एक विवाह आदर्श समजला जातो. हिंदू शास्त्रकार काही विशिष्ट परिस्थितीमध्येच पुरुषांना दुसरी पत्नी असण्यासाठी अनुमती देतात. वात्स्यायन, नारद, मनु यांच्या विवरणावरून लक्षात येते की, बहुपत्नीत्वाच्या पाठीमागे पुत्रप्राप्ती हा उद्देश असावा.

**विधवाविवाह :**

स्त्रिला समाजात जे काही मानाचे स्थान व सामाजिक दर्जा प्राप्त होत असे तो केवळ एखाद्याची पत्नी म्हणूनच मिळत असे. स्त्रीच्या वैवाहिक जीवनाचा आधार फक्त तिचा पती असे. गुप्तकालीन कालखंडामध्ये आपल्याला स्त्रीच्या पुनर्विवाहाबद्दल दोन मते पहावयास मिळतात. बृहस्पतीनुसार विधवांनी आजन्म ब्रह्मचर्याचे पालन करावे. व्रत, उपवास, तप, दान करावे किंवा सती जावे, परंतु पुनर्विवाह करू नये. परंतु नारद व पाराशर यांनी विधवा विवाहास अनुमती दिलेली आहे. 'अमरकोश'मध्ये विधवा पुनर्विवाहासाठी 'पुनर्भू' शब्दाचा वापर

केला गेला आहे. या काळामध्ये विधवांची स्थिती चांगली नव्हती. एकदा का आपला पती गमावला की स्त्रीचा सामाजिक दर्जा संपूर्णपणे नष्ट होत असे. विधवा स्त्रीचे सर्व सुख, सन्मान, आशाआकांक्षा नष्ट होऊन तिचे जिणे कंटाळवाणे, असहाय्य, अर्धमृत आणि अपमानास्पद होत असे.

**नियोग प्रथा :**

प्राचीन समाजामध्ये नियोग प्रथा ही प्रचलित होती. ज्या अतर्गत पतीविरहीत स्त्रिया पुत्रप्राप्तीसाठी दिरासोबत अथवा स्वत:च्या गोत्रातील व्यक्तिसोबत संबंध ठेवू शकते. पती रूग्ण असेल, नपुंसक असेल अशा परिस्थितीमध्ये सुद्धा अशा प्रकारचा संबंध स्थापित केला जात होता. अशा संबंधातून जन्माला येणाऱ्या पुत्राला क्षेत्रज पुत्र म्हणजे जात होते व तो आपल्या मृतपित्याच्या संपत्तीचा उत्तराधिकारी होता. स्मृतीग्रंथांनी नियोग प्रथेला अत्यंत कठोर प्रतिबंधांतर्गत मान्यता दिलेली आहे. मनू, याज्ञवल्क्य व नारद यांच्यानुसार नियोगीला विधवेसोबत एक पुत्र जन्माचाच अधिकार आहे. कालांतराने या प्रथेची अत्यंत निंदा करण्यात आली. मनूने त्यास पशुधर्माची संज्ञा दिली आहे. बृहस्पतीने ह्या प्रथेस निषिद्ध मानले आहे. अन्य शास्त्रकारसुद्धा ह्या प्रथेची निंदा करतात.

**सतीप्रथा :**

सती जाण्याची अमानुष चाल ही भारतीय समाजाला लागलेले गालबोट व लांछनास्पद गोष्ट होती. मृत पुरुषाच्या विधवा पत्नीने भारतीय स्त्रीवादाचा आदर्श या नात्याने मृत पतीच्या चितेवर स्वत:ला जाळून घेऊन सहगमन करावयाचे असे. पतीच्या निधनानंतर त्याच्या पत्नीला सती जाण्यासाठी प्रेरित केले जाई. गुप्तकाळातील साहित्य 'मृच्छकटिक' मध्ये चारुदत्ताची पत्नी सती गेल्याचे उदाहरण पहावयास मिळते. पहिले ऐतिहासिक सती गेल्याचे प्रमाण ५१० ई. मधील भानुगुप्ताच्या ऐरण अभिलेखामध्ये मिळते ज्यात गोपराज (सेनापती) च्या मृत्युनंतर त्याची पत्नी सती गेल्याचे पहावयास मिळते. गुप्तकाळामध्ये ह्या प्रथेला लोकप्रियता मिळाली नाही आणि त्याला कोणतीही शास्त्रीय मान्यता ही मिळू शकली नाही.

**पडदापद्धत :**

पडदापद्धतीचा प्राचीनतम उल्लेख महाकाव्याच्या वर्तमान संस्करणामध्ये

(१०० ई.पू.) मध्ये प्राप्त झालेला आहे. पडदा पद्धत उत्तर भारतात प्रचलित होती. साहित्यामध्ये याचा उल्लेख केला गेला आहे. परंतु दक्षिण भारतामध्ये पडदापद्धत अस्तित्वात नव्हती, कारण अजिंठा, एलोरा, सांची व भरहूत येथील चित्र, नाटक, मुद्रांवर ज्या राण्यांचे चित्र आहे त्यात त्यांनी कोठेही पडदा घेतलेला दिसून येत नाही, यावरून पडदापद्धत दिसून येत नाही. स्त्रिया स्वतंत्रपणे वावरत होत्या. परंतु कुलीन वर्गातील स्त्रियांमध्ये पडदा पद्धत दिसून येते. गुप्तकाळात पडदापद्धत जास्त विकसीत नव्हती. फहियान, ह्युएनत्संग व इत्सिंग यांनी या प्रथेचा उल्लेख केलेला नाही. 'मृच्छकटिक'मध्ये वसंतसेनेला पडदा धारण करण्यासाठी विरोध करताना पहावयास मिळते. माघच्या व भवभूतीच्या रचनांमध्ये पडदापद्धत प्रचलित असल्याची माहिती मिळते. स्त्रिया बंधनात जरी असल्या तरी त्यांना स्वतंत्रपणे वावरण्याची मुभा होती. त्यांना अनोळखी लोकांशी बोलण्याची परवानगी नव्हती. गुप्तकाळामध्ये पडदापद्धत पूर्णपणे नाही परंतु सामान्य पद्धतीने उच्चकुलीन वर्गातील स्त्रियांसाठी पहावयास मिळते, सामान्य स्त्रियांसाठी नाही.

**स्त्रीव्यवसाय :**

गुप्तकाळात उच्चवर्णीय स्त्रियांना उदरनिर्वाहाचे साधन नव्हते. कनिष्ट दोन वर्गांतील स्त्रियांना त्यांच्या उदरनिर्वाहासाठी अर्थार्जन करण्याची मोकळीक होती. त्यामुळे त्यांना थोडेफार स्वातंत्र्य मिळाले. मात्र तशाप्रकारे स्वातंत्र्य उच्चवर्णीय स्त्रियांना नाकारण्यात आले होते. वैश्य आणि शूद्र स्त्रिया शेतीची विविध कामे आणि घरगुती कामे करीत असल्यामुळे त्यांच्या पतीचे त्यांच्यावर अधिपत्य नसे. दक्षिण भारतात स्त्रियांकडे प्रशासनातील महत्त्वपूर्ण पदे असत. स्त्रिया, कलाकार, कवयित्री, गुप्तचर, शिक्षिका म्हणून कार्य करीत होत्या. परंतु गुप्तकाळात बालविवाह होत असल्याने स्त्रियांना शिक्षण घेता येत नसे. तरी उच्चवर्णीय स्त्रियांनी शिक्षण घेतले तरी त्या उदरनिर्वाहासाठी सर्वस्वी पतीवर अवलंबून होत्या, हे त्यांना समाजामध्ये दुय्यम स्थान मिळण्यामागचे प्रमुख कारण आहे.

**गणिका :**

गणिका समाज जीवनातील एक सामान्य अंग होत्या. गणिकांकडे पाहण्याचा समाजाचा दृष्टीकोन भावूकही नव्हता आणि उपेक्षितही नव्हता. समाजाच्या दृष्टीने गणिका समाजाचे अत्यावश्यक अंग होत्या. गणिकांना दिल्या जाणाऱ्या प्रशिक्षणाचे

वर्णन 'कामसुत्रात' येते. त्या काळात गणिकांचा व्यवसाय तेजीत होता व उच्च दर्जाच्या गणिकांना समाजात काही प्रमाणात प्रतिष्ठा होती. 'विदिशा'तील साहसी नवयुवकांनी गणिकांबरोबर केलेल्या क्रीडांचे वर्णन कालिदासाने केलेले आहे. उत्सवाच्या वेळी उत्सवात सहभागी होण्यासाठी मोठ्या संख्येने गणिका/वेश्या रस्त्यावर आल्याचा उल्लेख विशाखादत्तच्या 'मुद्राराक्षस'मध्ये आहे. वृद्ध वेश्यांना 'कुट्टनी' म्हटले जात होते; ज्या नवीन वेश्यांना मार्गदर्शकाचे काम करीत होत्या आणि यासाठी त्या त्यांच्या कमाईतील एक हिस्सा घेत. दयनीय परिस्थितीत असलेल्या कुमारिकांना वेश्याव्यवसायामध्ये आणले जात होते. 'कुट्टनीमतम'चे रचनाकार दामोदरगुप्त यांनी म्हटले आहे, 'जो वेश्यांच्या जाळ्यात अडकणार नाही तो जीवनात सुखी राहील.'

**मूल्यमापन :**

प्राचीन भारतीय ग्रंथांमध्ये व लेखकांमध्ये स्त्रियांसंबंधी परस्परविरोधी विचार मांडलेले आहेत. काही ग्रंथांमध्ये त्यांच्या चरित्राबद्दल दोष दाखवून त्यांची कटू आलोचना केली गेली आहे तर शास्त्रामध्ये व महाकाव्यामध्ये महत्त्वपूर्ण आदर्शाची प्रतिष्ठा स्त्रिला मिळाली आहे. शतपथ ब्राह्मणांमध्ये स्त्रीला पुरुषाची अर्धांगिनी म्हटले आहे, (अर्धो हवा एष आत्मनो). मनूने स्पष्ट लिहिले आहे की, मातेचे स्थान हे पित्यापेक्षाही श्रेष्ठ असते. गुप्तकाळातील समाजामध्ये स्त्रियांप्रती सामान्यपणे उदार व आदरपूर्वक विचार मांडण्यात आले आहेत. पत्नी, माता, कन्या म्हणून तिचा सन्मान करण्यात आला आहे. गुप्तकाळातील शिक्क्यांवर कुमारदेवी व लक्ष्मीचे चित्र उच्चवर्गातील स्त्रियांच्या सन्मानाचे प्रतीक होते. गणिकांना समाजामध्ये महत्त्वाचे स्थान होते तरी सुद्धा आपल्याला पहावयास मिळते की, धर्माचा आधार घेऊन त्यांच्यावर सामाजिक बंधने लादली गेली.

**संदर्भ :**

१. श्रीवास्तव के.सी., ***प्राचीन भारताचा इतिहास व संस्कृती,*** युनायटेड बुक डेपो प्रकाशन, इलाहाबाद, अकरावी आवृत्ती, २०११-१२, पृ.१८८.
२. सांकृत्यायन राहुल, ***रामराज्य व मार्क्सवाद,*** पीपल्स पब्लिशिंग हाऊस प्रकाशन, नवीदिल्ली, प्रथम आवृत्ती १९५९, पृ.५७.
३. चौबे सौरभ, ***प्राचीन भारत,*** युनिव्हर्सल बुक्स प्रकाशन, प्रयागराज, संशोधित

आवृत्ती, जानेवारी २०२०, पृ.४७७.
४. तत्रैव, पृ.४५५ ते ४५७.
५. श्रीवास्तव के.सी., उपरोक्त क्र.१, पृ.१८३.
६. प्रा.शर्मा आर.एस., फडके वासंती (अनु.), *प्राचीन भारत*, के.सागर प्रकाशन पुणे, २०११, पृ.२१३-१४.
७. श्रीवास्तव के.सी., उपरोक्त क्र.१, पृ.१८४.
८. **याज्ञवल्क्य स्मृती** २.१४५
९. **याज्ञवल्क्य स्मृती** १.५१
१०. डॉ.आचार्य धनंजय, *प्राचीन भारत*, श्रीसाईनाथ प्रकाशन नागपूर, प्रथम आवृत्ती जाने.२००५, पृ.५०५.
११. श्रीवास्तव के.सी., उपरोक्त क्र.१, पृ.१७९.
१२. डॉ.आचार्य धनंजय, उपरोक्त क्र.१०, पृ.५११.
१३. श्रीवास्तव के.सी., उपरोक्त क्र.१, पृ.१८
१४. डॉ.आचार्य धनंजय, उपरोक्त क्र.१०, पृ.क्र.५०७.

●●●